पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे-44
जा.क्र.अक्षेका/11/कावि/211/2016
दिनांक 19 / 5/2016

प्रति,

मा.श्री./श्रीम. ------------------------------
सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- 44

विषय:- अ प्रभाग समितीची विशेष सभा सोमवार
दिनांक 23/5/2016 रोजी आयोजित केलेबाबत.. .

**मा. महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा सोम**वार दिनांक 23/5/2016 रोजी दुपारी 12.00** वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. प्रस्तुत सभेस कृपया आपण उपस्थित रहावे, हि विनंती.

**आपली विश्वासू,**

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**अ प्रभाग समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक 3**

**दिनांक :- 23/5/2016** **वेळ: दुपारी 12.00 वाजता**

..........................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मे 2016 ची मासिक सभा सोमवार दिनांक 23/5/2016 रोजी दुपारी 12.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ] दि. 9/3/2016 रोजी घेणेत आलेल्या माहे मार्च 2016 चे मासिक सभेचा सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्र. 12 ] कायम करणे. तसेच दि. 6/4/2016 रोजी घेणेत आलेल्या माहे एप्रिल 2016 चे मासिक सभेचा सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्र. 1 ] कायम करणे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ | मा. प्रसाद शंकर शेट्टी, सदस्य यांचा दिनांक १३/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ. सो.६.०० मीटर रुंद रस्त्यास " हस्तीमल शेठ गादिया मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.<br>(दिनांक 23/5/2016 रोजीच्या सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक २ | मा.संगिता भोंडवे, सदस्या यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>शुभारंभ कॉलनी, स.नं.( १३१/२ व १३०/१ मधील ) यास शुभारंभ कॉलनी असा नामफलक बसवून मिळणेबाबत मान्यता देणेबाबत.<br>( दि.23/5/2016 रोजीचे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे ) |
| विषय क्रमांक ३ | मा. चारुशीला प्रभाकर कुटे, सदस्या यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील रस्त्याचे नामकरण ठराव करणेबाबत.<br>प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण " तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल बँक या अंतर्गत रस्त्याला " कै. चंपालाल जैन मार्ग " तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग " व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला " कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग " , आदर्श मित्र मंडळ समोरील रस्त्यास " कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे " आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास " कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.(दिनांक 23/5/2016 रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक ४ | मा. नंदा विकास ताकवणे, सदस्या यांचा दि.१७/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.<br>से. २८ मधील २ चौकांचे नामकरण करणेबाबत.<br>से. २८ मधील संजय काळे ग्राऊंड शेजारील चौकाचे " एकता चौक " व से २८ मधील मारुती मंदिर शेजारील आतील चौकाचे " आंबा चौक " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.<br>(दिनांक 23/5/2016 रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ५ | मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.<br>रावेत बीआरटीएस रोडवरती श्री.बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलका शेजारील चौकास कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक व सोनटक्के वस्ती , स.नं. १२/५ रावेत या ठिकाणी यशवंतनगर, सोनटक्के वस्ती असे नामकरण करणेबाबत.<br>(दिनांक 23/5/2016 रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक . ६ | मा. अध्यक्ष निलेश पांढरकर यांचा दि. 19/5/2016 रोजीचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 16 आकुर्डी गावठाण मधील सुभाष पांढरकर नगर येथील बीना इंग्लिश मिडीयम स्कुल समोर एक मुतारी आहे तसेच शाळेच्या शेजारी सुध्दा स्वच्छतागृह व मुतारी असल्यामुळे शाळेसमोरील मुतारीची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरची मुतारी काढल्यास शाळेसमोरचा परिसर स्वच्छ राहील.<br>तरी सदर शाळेसमोरील मुतारी काढणेबाबत विचार करणे. |
| विषय क्रमांक. ७ | मा. अध्यक्ष निलेश पांढरकर यांचा दि. 19/5/2016 रोजीचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 16 आकुर्डी गावठाण मधील सुभाष पांढरकर नगर येथील बीना इंग्लिश मिडीयम स्कुल समोर मोकळया जागेत, परिसरात राहणारे रहिवासी तिथे त्यांच्या मुलांना शौचास बसवित असल्याने तो परिसर दुर्गंधित होतो. परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी त्या जागेवर एक वाचनालय सुरु केल्यास त्या भागातील नागरिक विशेषत: ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयीचे होईल.<br>तरी सदर शाळेसमोरच्या मोकळया जागेत एक वाचनालय सुरु करणेबाबत विचार करणे . |
| विषय क्रमांक ८ | मा. अध्यक्ष निलेश पांढरकर यांचा दि. 19/5/2016 रोजीचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 16 आकुर्डी गावठाण मधील जिजानगर परिसरात 4 शीटचे फायबर शौचालय आहे. तेथील जागा मालकांनी सदर शौचालय काढणेकामी विनंती केली आहे. त्यामुळे त्याठिकाणचे 4 शीटचे फायबर शौचालय काढणे आवश्यक असल्याने त्याबाबत विचार करणे . |
| | **मा. सभापती** यांचे पुर्वपरवानगीने सभा कामकाजात घेणेत येणारे ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणे. |

**सही/-**

**प्रशासन अधिकारी तथा**

**सचिव (सभाशाखा)**

**अ प्रभाग समिती**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-44

क्रमांक अक्षेका/11 /कावि/ 211 /2016

दि. 19 /5/2016